# राजाचे कारंजे

लेखन : लॉयड एलेग्जेंडर
चित्र : एज़रा जैक कीट्स






# राजाचे कारंजे

मराठी : अर्चना



एकदा एका राजाने आपल्या आलिशान बागेत भव्य कारंजे बनवायचा निश्चय केला. त्यामुळे त्याचे व त्याच्या राज्याचे वैभव तर वाढलेच असते आणि कीर्ती पण सगळीकडे पसरली असती. पण ते कारंजे बांधल्यामुळे संपूर्ण राज्याचं पाणी बंद होणार होतं.



एका गरीब माणसाने ते ऐकलं आणि आपल्या बायकोला म्हणाला, “काही दिवसात आपली मुलं पाण्यासाठी रडतील, जनावरं आजारी पडतील आणि आपण सर्व तहानेने मरून जाऊ”.

त्याची बायको म्हणाली, “एखाद्या बुद्धिमान आणि विद्वान माणसाने राजाला समजावलं पाहिजे कि हि त्याची योजना किती मूर्खपणाची आणि घातक आहे”.





तो गरीब माणूस शहरातील अत्यंत विद्वान अशा माणसाकडे गेला आणि त्याच्या पाया पडून राजाला समजावण्याची विनंती केली. पण तो विद्वान मनुष्य स्वतः च्या  विचारात इतका मग्न होता कि त्याच्या बोलण्याकडे त्याने ना फारसं लक्ष दिलं ना त्यानं काही रुची दाखवली.





उलट तो विद्वान त्याला मोठ्या मोठ्या गोष्टी सांगू लागला त्यातलं त्या गरिबाला काहिही समजलं नाही.

तो बिचारा उदास चेहेऱ्याने परतला आणि त्याच्या मनात आलं, “जर अशा मोठया-मोठ्या बोलण्याने तहान भागली असती तर किती बरं झालं असतं. अशा बुद्धिमत्तेचा काय फायदा जी सामान्य माणसाला समजतच नाही”.

त्याने विचार केला जर एखाद्या वाकचतुर माणसाने जर राजाला समजावले तर राजा ऐकेल आणि समजेल सुद्धा.

म्हणून तो बाजारपेठेत गेला आणि तिथले व्यापारी जे बोलण्यात आणि गिऱ्हाईक पटवण्यात माहीर होते त्यांच्या कडे गेला.

त्यांना जेंव्हा कळलं तो कशासाठी आलाय तेंव्हा त्यांच तोंडचं बंद झालं त्यांच्या तोंडातून शब्दाच फुटेनात.आनंदाने सल्ले देणाऱ्या त्या व्यापाऱ्यांची राजा समोर बोलण्याची हिंमत नव्हती.

त्या गरीब माणसाने शेवटी थकून घरचा रस्ता पकडला तो विचार करू लागला, “दुर्दैवाने, ह्या गोड गोड गोष्टी केवळ पोकळ आहेत. कारण त्यांना काही करायची हिम्मत नाही. अशा गोड बोलण्याचा काय फायदा ज्यांच्या मधे हिम्मतच नाही काही करण्याची”.

एखाद्या ताकद आणि हिम्मत असणाऱ्या माणसाला राजाकडे समजावयाला पाठवलं पाहिजे जो राजाला त्याचे चुकीचे विचार बदलायला भाग पाडेल.




मग तो परत बाजारात गेला आणि त्याने एक ताकदवर, निर्भय आणि शूर माणूस शोधला तो होता लोहार. तो लोखंडाच्या सळ्या इतक्या सहजतेने वाकवायचा जणूकाही तो बुटाची लेस बांधतो आहे.


लोहाराला राजाच्या विरोधात उभे रहायची कल्पना आवडली. तो सांगू लागला राजवाड्यात शिरता क्षणी मी खिडक्या फोडीन, दरवाजे तोडीन आणि सिंव्हासनाचा चक्का चूर करिन.

तो गरीब माणूस परत निराश झाला. तो जाणून होता की लोहार असं काही करायच्या आधीच राजाचे सैनिक त्याला मारून टाकतील. आणि रागावलेला राजा कारंजे बनवायचा त्याचा विचार अजूनच पक्का करेल. फुशारक्या मारणाऱ्या लोहाराला तिथे सोडून तो परत निराशेने चालू लागला, त्याच्या मनात विचार आला.

“नुसती ताकद असुन काय उपयोग जर बुद्धीची साथ नसेल. अशा ताकदीचा काय उपयोग जी उद्देशच पुरा करत नाही”.






निराश आणि जड अंतःकरणा ने तो घरी गेला. शेजारच्यांना आणि घरच्यांना त्याने सांगितलं की कारंजे बांधणे थांबवु शकेल असा कोणीही मला मिळाला नाही.

त्याची मुलगी पटकन म्हणाली, “पण बाबा तुम्ही का जात नाही?”

गोंधळलेला तो निरुत्तर झाला. बिचारा गरीब आपल्या बायको मुलांचं तोंड बघु लागला. “माझी मुलगी खरच बोलते आहे हे काम मलाच केलं पाहिजे”.






तो गरीब माणूस घरातून निघाला त्याची पावलं डोंगराच्या दिशेने चालू लागली. डोंगर फार उंच होता तो संपता संपत नव्हता.



शेवटी एकदा तो राजाच्या राजवाड्या पाशी पोचला. घाबरलेला तो बराच वेळ राजवाड्याच्या बाहेरच उभा होता.









राजाचे शिपाई त्याला राजाच्या दरबारात घेऊन गेले. राजाने रागाने त्याला यायचे कारण विचारले.

पाय थरथरत आणि दात कडकडत असलेल्या त्या गरीब माणसाने कारंजे बांधल्यामुळे जनतेला होणाऱ्या नुकसानी बद्दल सांगितले.

“बास,” राजा रागाने म्हणाला, “मी राजा आहे आणि मला तू प्रश्न विचारतो आहेस?”

त्या गरीबाच्या मनात विचार आला मला त्या बुद्धिमाना सारखी बुद्धी असती तर.



थरथरत तो बिचारा एव्हढच बोलु शकला, “तहान तहान असते, गरीब माणसाला तेव्हढीच लागते जेव्हढी राजाला”.

त्याची जीभ सुकून गेली तेंव्हा त्याच्या मनात विचार आला जर का माझ्याकडे त्या व्यापाऱ्यां सारखं वाक् चातुर्य असतं तर, मी पण मुद्देसूद बोलू शकलो असतो.

राजाने मोठ्ठे डोळे केले आणि तो म्हणाला, “अच्छा म्हणजे ह्या गोष्टीसाठी तू मला त्रास द्यायला आला आहेस तर मी एक चुटकी वाजवली तर माझे सैनिक तुझं डोकं धडा पासून वेगळं करतील”.

त्या गरीब माणसाच्या मनात विचार आला ,जर माझ्या कडे त्या लोहारा सारखी ताकद असती तर किती बरं झालं असतं. होती नव्हती ती सगळी ताकद एकवटून तो म्हणाला, “माला मारायचा तुम्हाला पूर्ण अधिकार आहे ,पण मला मारून परिस्थिती बदलणार नाही. तुझी प्रजा तहानेने तडफडून मरेल. जेंव्हा-जेंव्हा तू त्या भव्य सुंदर कारंजा कडे बघशील तुला ती मेलेली आपली प्रजा आठवेल”.




राजा ताडकन उठून उभा राहिला, तो शिपायांना बोलावणारच होता कि क्षणभर थांबला आणि विचार करू लागला. मग म्हणाला :

"तू भोळा भाबडा दिसतोस, चातुर्य ने तुला बोलणे जमत नाही. तू अडखळत बोलतोस पण एक लबाड सल्लागारा च्या गोड बोलण्यापेक्षा तुझ्या बोलण्यात सच्चे पणा आहे. तुझी शरीरयष्टी बारीक आहे पण तुझं हृदय मजबूत आहे खरं बोलण्याची तुझ्यात ताकद आहे. तू म्हणशील तसच होईल".



तो गरीब माणूस आपल्या गावी परतला आणि त्याने ही गोष्ट सगळ्यांना सांगितली. विद्वानाने ही गोष्ट तिखट मीठ लावून आपल्या पुस्तकात लिहिली पण ते पुस्तक कुठेतरी हरवले. व्यापाऱ्याने सुध्दा हि गोष्ट सगळ्यांना फुशारकी मारून सांगितली, लोहार तर इतका खुश झाला की आनंदाच्या भरात एरण उचलली आणि घराची खिडकीच फोडून टाकली.





तो गरीब माणूस आपल्या कुटुंब बरोबर आनंदात बसला होता, त्याचा अजून विश्वास बसत नव्हता कि त्याने हे खरेच  सगळे केले.

समजदार बुद्धी, वाक् चातुर्य, साहसी हृदय काहीही असो पण आता कोणी तहानलेले राहणार नाही.



